“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

# Newspaper Clippings

# 2019-20

तरूण भारत

13-07-2019

# एएससी महाविद्यालयातर्फे कबनूर येथे वृक्षारोपण

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाच्यावतीने व ग्रामपंचायत कबनूर यांच्या सहकार्याने एनसीसीने वृक्षारोपणाचा उपक्रम पार पडला. एनसीसीच्या ३५ कॅडेट व बॉटणीच्या ३० विद्यार्थी–विद्यार्थिनींनी सुमारे २०० रोपे लावली. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, उपसरपंच प्रदीप मणेरे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ सहभागी झाले होते. संयोजक कॅ. मोहन विरकर, प्रा. एस. टी. इंगळे, प्रा. व्ही. ए. पाटील, मुकादम सुनिल हेगडे यांचे सहकार्य लाभले. प्रा. आकाश बनसोडे, प्रा. मधु शिंदे, रजिस्ट्रार डी. एस. लोकरे उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
दि. 13.07.2019




इचलकरंजी : प्रदूषण जनजागृती पंधरवडा सांगता समारंभात एनसीसी कॅडेटना मार्गदर्शन करताना डॉ. एस. टी. इंगळे. व्यासपीठावर प्रा. कॅप्टन मोहन वीरकर, कॅप्टन सी. पी. कोरे आदी.

# प्रदूषण जनजागृती पंधरवडा सांगता

**इचलकरंजी :** शहरातील सर्व एनसीसी कॅडेटतर्फे प्रदूषण जनजागृती पंधरवडा सांगता समारंभ एएससी महाविद्यालयात झाला. प्रदूषणाविषयी विद्यार्थ्यांनी जागरूक राहणे गरजेचे आहे. समाजातील वाढत्या प्रदूषणाबद्दल जनजागृती करणे ही एनसीसी कॅडेटची नैतिक जबाबदारी आहे, असे मत प्रमुख वक्ते प्रा. डॉ. एस. टी. इंगळे यांनी व्यक्त केले. जनजागृती पंधरवडा काळात प्रदूषण रॅली, प्रदूषणविषयी व्याख्यान, कार्यशाळा शहरात आयोजित केली होती. कार्यक्रम प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व कर्नल उदय बारावकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी कॅप्टन मोहन वीरकर, प्रा. आकाश बनसोडे, कॅप्टन सी. पी. कोरे, कॅप्टन एस. पी. सगरे, प्रा. सुखदेव सजगणे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
शनिवार,
२७ जुलै २०१९

# 'डीकेएससी'त कारगिल विजय दिवस

इचलकरंजी, ता. २६ : येथील डीकेएससी महाविद्यालयात शहरातील सर्व एनसीसी कॅडेटच्यावतीने कारगिल विजय दिवस उत्साहात झाला. एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय कँपसमध्ये देशप्रेम जागृत करणारे पथनाट्य सादर केले. उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांनी कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांना आदरांजली वाहिली.

अशा उपक्रमातून सुज्ञ नागरिक घडून देशाप्रती सेवेची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते. म्हणून एनसीसी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात चैतन्य वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी स्वीकारावी व स्वतःला सिद्ध करावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. एनसीसी विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचेही आयोजन केले होते. अनिरुद्धाज् अकॅडमीचे जयदीप पाटील, सिद्धार्थ साळुंखे व जितेंद्र साळुंखे यांनी विविध प्रात्यक्षिकातून आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून दिले.

स्वतःचा जीव वाचवून इतरांच्या जीवाचे रक्षण कशा प्रकारे करता येते हे आपत्ती व्यवस्थापन शिकवते. आसपासच्या परिसरात घडणाऱ्या छोट्या-मोठ्या आपत्तीत विविध कौशल्यतंत्राने आपण इतरांना कसे वाचवू शकतो याचे मार्गदर्शन प्रात्यक्षिकाद्वारे जयदीप पाटील यांनी केले.

हा उपक्रम ५६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल उदय बारावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी प्रा. कॅप्टन मोहन वीरकर, कॅप्टन सी. पी. कोरे, कॅप्टन एस. पी. सगरे, प्रा. आकाश बनसोडे, प्रा. व्ही. बी. पाटील, प्रा. डी. सी. कांबळे उपस्थित होते. तसेच शहरातील गोविंदराव हायस्कूल, बापूजी साळुंखे हायस्कूल, एएससी कॉलेजचे एनसीसी विद्यार्थी उपस्थित होते.



इचलकरंजी : येथील डीकेएससी महाविद्यालयात कारगिल विजय दिवसप्रसंगी पथनाट्य करताना एनसीसी विद्यार्थी.

Scanned with CamScanner

दै. सकाळ

23/8/2019



इचलकरंजी : येथील एएससी महाविद्यालयात झाडांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरे करण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. डॉ. पी. पी. पुजारी आदी.

## कदम महाविद्यालयात झाडांना राखी

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालयात प्राणिशास्त्र विभागाच्या इको क्लब, नेचर क्लबतर्फे कॉलेज परिसरातील झाडांना राखी बांधण्यात आली. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार मार्गदर्शन केले. प्राणीशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. पी. पी. पुजारी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी ग्रीन ऑडिट कमिटी चेअरमन प्रा. डॉ. निलोफर शेख, प्रा. डॉ. गाणबावले, रसायनशास्त्र विभागा प्रमुख डॉ. घारे, प्रा. पाटील, प्रा. कॅप्टन वीरकर, प्रा. ढोबळे, प्रा. डॉ. तपासे, प्रा. रॉड्रीक्स, बी. टी. यादव, पी. डी. फडतरे, प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा. डॉ. रेश्मा सनदी, प्रा. फातिमा मुल्ला, प्रा. सलीमा नदाफ यांनी केले. आरजू मुजावर हिने सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. पी. के. वाघमारे आभार मानले.

Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

28/8/2019

# डीकेएएससी कॉलेजमध्ये एनसीसी भरती उत्साहात

**इचलकरंजी :** ५६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कोल्हापूर अंतर्गत डीकेएएससी कॉलेजमध्ये १७ जागांसाठी भरती आयोजित केली होती. यामध्ये मुलांसाठी ११ व मुलींसाठी ६ जागा होत्या. या भरतीसाठी २१० मुले व ५० मुली उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या. या भरतीसाठी ३ किलोमीटर धावणे, पुश अप्स, पुलप्स, सिट अप्स या मैदानी परीक्षा, लेखी व वैद्यकीय परीक्षा घेवून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. भरतीचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. ५६ महाराष्ट्र बटालियनचे सुधाकर नवगिरे, हवालदार समाधान यांनी पारदर्शकपणे भरती प्रक्रिया राबवली. नियोजन प्रा. कॅ. मोहन वीरकर यांनी केले. एएससी महाविद्यालयामध्ये ५६ कॅडेट युनिट कार्यरत आहेत. ही भरती कर्नल उदय बारावकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

29/8/2019

## प्रा. सुनीता वेल्हाळ यांना इंग्रजी विषयात पीएचडी

**कोल्हापूर :** डीकेएएससी कॉलेज इचलकरंजीमधील



इंग्रजी विभागातील सहयोगी प्राध्यापिका सुनीता जयंत वेल्हाळ यांनी शिवाजी विद्यापीठाची इंग्रजी विषयातील पीएचडी पदवी नुकतीच संपादन केली. 'स्ट्रक्चर ऑफ पोस्टप्रेडीकेटर सेन्टेस एलिमेंटस् इन इंग्लिश ऑफ टिचर्स टिचिंग इन सिलेक्टेड प्रोफेशनल कॉलेजीस इन कोल्हापूर, सांगली ॲण्ड सातारा डिस्ट्रीक्स" असा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. प्राचार्य डॉ. अशोक करांडे यांचे मार्गदर्शन लाभले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व प्राचार्य डॉ. एम. एस. हुजरे यांचे सहकार्य लाभले. शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभागप्रमुख डॉ. अक्षय सरवदे यांचेही त्यांना मार्गदर्शन मिळाले.

Scanned with CamScanner

दै. महासत्ता दि. 5/9/2019

# लायन्स गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर

**इचलकरंजी,ता. ४–**

डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनी साजरा होणाऱ्या शिक्षक दिनाचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ इचलकरंजीने शहरातील गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर केले.

लायन्स गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठीची निवड कमिटी चेअरमन, माजी अध्यक्ष गजानन होगाडे यांनी केली. यासाठी विजयकुमार राठी व लिंगराज कित्तुरे यांचे सहकार्य लाभले. लायन्स क्लब ऑफ इचलकरंजीचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी पुरस्कार प्राप्त शिक्षकांची नावे जाहीर केली.



व्ही.एस.वांद्रे प्रा.सुनिता तेलसिंगे महंमदरफिक्क मांगुरे लक्ष्मण कांबरे सुनिता जमादार

विविध शैक्षणिक विभागातून निवडण्यात आलेल्या गुणवंत शिक्षकांमध्ये महाविद्यालयीन विभागातून प्रा. व्ही. एस. वांद्रे (दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी), प्रा. सौ. सुनिता श्रीरंग तेलसिंगे (अण्णा डांगे कॉलेज हातकणंगले), माध्यमिक विभागातून महंमद रफिक्क इब्राहीम मांगुरे (शहापूर हायस्कूल शहापूर), प्राथमिक विभागातून लक्ष्मण तानाजी कांबरे (इचलकरंजी नगरपालिका प्राथमिक शा. नं. २) व बालवाडी विभागातून सौ. सुनिता बाळकृष्ण जामदार (डी. के. टी. ई. चे अनंतराव भिडे विद्यामंदिर (इंग्लिश मिडीयम) इचलकरंजी.) यांचा समावेश आहे.

यावेळी माजी प्रांतपाल डॉ. विलास शहा,बाबासाहेब कित्तुरे, अरुण पाटील,विनय महाजन, विजयराज जाजू, महेश सारडा व क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ

11-9-2019

सकाळ

# 'डीकेएएससी' महाविद्यालयात तायक्वाँदो स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

**इचलकरंजी, ता. १० :** येथील 'डीकेएएससी' महाविद्यालयात तालुकास्तरीय तायक्वाँदो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा कार्यालय कोल्हापूर यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या या स्पर्धेत शहर व परिसरातील विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ॲड. दशरथ माने यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. खेळामुळे सशक्त नागरिक घडू शकतो व खेळातून उज्ज्वल भविष्य घडविण्याची संधी मिळते, असे मत ॲड. माने यांनी या वेळी व्यक्त केले. कॅप्टन मोहन वीरकर यांनी स्पर्धेचे संयोजन केले. पद्माकर कांबळे, मेघराज सातपुते, महेश गवंडी, प्रा. शेखर शहा, प्रा. सुखदेव सजगणे यांनी पंच म्हणून काम पाहिले.



**इचलकरंजी : येथील 'डीकेएएससी' महाविद्यालयात तायक्वाँदो स्पर्धेचे उद्घाटन करताना ॲड. दशरथ माने, कॅप्टन मोहन वीरकर आदी.**

Scanned with CamScanner

दै. पुढारी, दि. 16/9/2019

# इचलकरंजीत ‘मुलगी झाली हो’ पथनाट्याचे सादरीकरण

## ‘महिला सक्षमीकरण’ पोस्टर प्रदर्शनाला प्रतिसाद

**इचलकरंजी : प्रतिनिधी**

येथील डीकेएएससी महाविद्यालयातील क्रांतिज्योती सावित्री मंचच्या वतीने ‘मुलगी झाली हो’यापथनाट्याचेसादरीकरणकरण्यात आले. स्त्री-पुरुषांची एकमेकांकडे पाहण्याची दृष्टी बदलावी व तरुण पिढीमध्ये जागृती व्हावी, यासाठी या पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिला सक्षमीकरण या विषयावरील पोस्टर प्रदर्शनाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमात महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार निवारण कमिटीचे सहकार्य लाभले.

यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. डॉ. पी. पी. पुजारी, प्रा.डॉ. सुनीता वेल्हाळ, प्रा. डॉ. चनगुंडी, सावित्री मंचचे अमोल केरकर, सुवर्णा तळेकर, शोभा कोकीटकर, प्रज्ञा सराफ, जयश्री पंडित आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ

18/9/2019

# 'नॅक'च्या नवीन प्रणालीवर कार्यशाळा

इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात 'नॅक'च्या नवीन प्रणालीनुसार गुणवत्ता वाढीसाठी एक दिवसीय कार्यशाळा झाली. 'आयसीटी इन टिचिंग लर्निंग' या विषयावर घेतलेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसाठी 'नॅक'च्या नवीन प्रणालीची ओळख होणे आवश्यक असून शिक्षणातील नवे बदल स्वीकारले पाहिजेत, असे मत प्राचार्य डॉ. कुंभार यांनी व्यक्त केले. कार्यशाळेमध्ये एलबीएस कॉलेज सातारा येथील प्रा. डॉ. डी. आर. भुटीयानी व डॉ. प्रा. पी. पी. लोहार यांनी मार्गदर्शन केले. प्रा. अक्षय स्वामी यांनी ब्लॉग रायटिंग या विषयी माहिती दिली. विनायक गाणबावले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. ए. पी. जाधव यांनी आभार मानले. प्रा. डॉ. आतिष पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ

18/9/2019




**इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंसमवेत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. मोहन वीरकर आदी.**

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये उल्लेखनीय यश प्राप्त केले. निकिता बोंगार्डे हिने ३००० मीटर, १५०० मीटर धावणे प्रथम, सीमरन मकानदार ८०० मीटर प्रथम, स्फुर्ती माने उंचउडी प्रथम, सुचिता वाळवेकर ५००० मीटर प्रथम, गुड्डी सिंह भालाफेक, उंचउडी प्रथम, प्रिया गणवाले उंचउडी प्रथम, सुशांत केणे ४०० मीटर धावणे प्रथम, वैभव जाधव ८०० मीटर धावणे प्रथम, तोहिद कुरणे ४०० मीटर, ८०० मीटर धावणे प्रथम, ऋतुराज सावंत १५०० मीटर प्रथम तर मनोज पोवार याने ३००० मीटर धावण्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. खेळाडूंची कोल्हापूर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

Scanned with CamScanner

दैनिक सकाळ

दि. 24/9/2019




इचलकरंजी : डीकेएएसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे परिसरात साक्षरता दिंडी काढण्यात आली.

## डीकेएएसी महाविद्यालयातर्फे साक्षरता दिंडी

इचलकरंजी : येथील डीकेएएसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे परिसरात साक्षरता दिंडी काढण्यात आली. या दिंडीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त भाषिक बहुविविधतेतून साक्षरतेसमोरील नवीन आव्हाने पेलताना लोकांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने या दिंडीचे आयोजन केल होते. साक्षरता पंधरवड्यानिमित्त व्याख्याने, बैठका, चर्चासत्रे, परिसंवाद, भित्तीपत्रिका प्रदर्शन अशा विविध कार्यक्रमांचेही आयोजन केले होते. कार्यक्रम अधिकारी प्रा. टी. एस. हराळे, प्रा. कटकोळे, प्रा. मोहन वीरकर आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ

27/9/2019

# डीकेएएससी महाविद्यालयातर्फे स्वच्छता रॅली

**इचलकरंजी, ता. २५ :** येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या वतीने शहरात स्वच्छता जनजागृती रॅली काढण्यात आली. याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. स्वच्छतेचा नागरिकांना संदेश देताना प्रथम याची आपल्यापासून सुरवात केली पाहिजे, असे मत प्राचार्य कुंभार यांनी व्यक्त केले. स्वच्छता पंधरवड्यानिमित्त स्वच्छतेचे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जाणार असून, २ ऑक्टोबरला महात्मा गांधी जयंतीदिवशी याचा समारोप होणार आहे.

शहरात डीकेएएससी महाविद्यालय, शिवाजी पुतळा, गर्ल्स हायस्कूल, शिवाजीनगर पोलिस स्टेशन, तीनबत्ती चौक, पंचवटी टॉकीज या परिसरात स्वच्छता रॅली काढण्यात आली. एक 'भारत स्वच्छ भारत' अशा घोषणा देत एनसीसी विद्यार्थ्यांनी नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला. रॅलीत गोविंदराव हायस्कूल, बापूजी साळुंखे हायस्कूलच्या एनसीसी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

५६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल उदय बारावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली काढली. प्रा. कॅप्टन मोहन वीरकर, सी. पी. कोरे, एस. बी. सगरे आदी उपस्थित होते.




**इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या वतीने स्वच्छता जनजागृती रॅलीचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कॅप्टन मोहन वीरकर.**

Scanned with CamScanner

दै. सकाळ

27/9/19



इचलकरंजी : येथील राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त वक्ते प्रा. डॉ. तातोबा बदामे यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार.

## डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन

इचलकरंजी : 'येथील डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात झाला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या क्षमता ओळखून करिअर निवडणे आवश्यक आहे. युवकांची असणारी शक्ती विधायक कार्यासाठी वापरणे एनएसएसमुळे शक्य झाले असून, हे व्यक्तिमत्त्व विकास घडविण्याचे महत्त्वाचा साधन आहे,' असे मत प्रा. डॉ. तातोबा बदामे यांनी मांडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. राष्ट्रीय योजना दिन ते गांधी जयंती हा एनएसएस सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. सप्ताहात विविध समाजपयोगी आणि स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. समारंभाला कार्यक्रम अधिकारी प्रा. टी. ए. हराळे, प्रा. कटकोळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. एम. एम. कांबळे, प्रा. डॉ. सौ. पी. के. वाघमारे, प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

करण्यात आली.

# मतदानाचा जागर

## इचलकरंजीत मानवी साखळीसाठी हजारो तरुण-तरुणींचा सहभाग

**इचलकरंजी, ता. १ : मानवी साखळीतून मतदानाचा जागर करत आज शहरातील हजारो तरुण-तरुणी 'सकाळ'च्या उपक्रमात सहभागी झाले. 'सकाळ'च्या या उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक झाले. जगातील सर्वांत मोठी लोकशाही असा गौरव असलेल्या भारत देशात आजही मतदानाबाबत जागृती करणे गरजेचे बनले आहे. ३० ते ४० टक्के नागरिक आजही मतदान करत नाहीत. यासाठीच 'सकाळ माध्यम समूहा'ने 'आय विल व्होट' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी आणि क्रेडाई इचलकरंजी यांचे या उपक्रमासाठी सहकार्य लाभले.**

02/10/2019 सकाळ

'सकाळ'चे सहायक व्यवस्थापक (विक्री) दत्तात्रय टोणपे, बातमीदार पंडित कोंडेकर, ऋषीकेश राऊत, वितरणचे मनोज खेतमर, संतोष जेरे, पद्माकर खुरपे आदींनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

### भव्य मानवी साखळी

एएससी महाविद्यालय ते छत्रपती शिवाजी पुतळा या मार्गावर मानवी साखळीचे आयोजन केले

### डीकेएएससी महाविद्यालय

या महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेना व राष्ट्रीय सेवा योजनासह वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. कॅप्टन मोहन वीरकर, प्रा. टी. ए. हराळे, प्रा. कटकोळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. बी. पाटील, प्रा. सौ. वैशाली ढोबळे यांचे सहकार्य मिळाले.

होती. मुख्याध्यापिका सुप्रिया गोंदकर यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडाशिक्षक प्रा. शेखर शहा यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले होते. यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य आर. एस. पाटील, उपमुख्याध्यापक बी. आर. कांबळे, ए. डी. कांबळे, वाय. बी. बंडगर यांचे सहकार्य मिळाले.

### व्यंकटेश महाविद्यालय

मिलिंद दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनंत दांडेकर, प्रा. उमेश हेब्बाळकर, श्री. कोळेकर, शंकर पवार, महंमद पठाण, बाळगोंड पाटील यांचे या उपक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले.

### वाहतूक शाखेचे सहकार्य

शहराच्या मुख्य रस्त्यावर आयोजित या कार्यक्रमासाठी शहर वाहतूक शाखेचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

दै. सकाळ

14/10/2019

# डीकेएएससी महाविद्यालयात वन्यजीव सप्ताह

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता.१३ : येथील डीकेएएससी महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने वन्यजीव सप्ताह विविध उपक्रमांनी झाला. निसर्गप्रेमी, पक्षी अभ्यासक सौ. चिक्तला कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार होते. निसर्ग आणि मानव यांच्यातील सहसंबंध सांगत निसर्ग व पक्षी यांचा अभ्यास करताना आलेले अनुभव सौ. कुलकर्णी यांनी सांगितले. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांनी निसर्गातील प्रत्येक घटकाला टिकवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

वन्यजीव सप्ताहात वक्तृत्व, वादविवाद, रांगोळी, पोस्टर प्रदर्शन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले. प्रवास आणि जैवविविधता, आपत्ती व्यवस्थापन, प्लास्टिक बंदी, कीटकनाशकांचा आरोग्यावर परिणाम अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रकट मते वाद-विवाद व वक्तृत्व स्पर्धेतून व्यक्त केली. वातावरणातील बदल, जैवविविधता, प्लास्टिक परिणाम या विषयांवर विद्यार्थ्यांनी रांगोळी रेखाटून व पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती केली. यावेळी प्राणिशास्त्र विभागातील विविध जाती जमातीच्या प्राणी-पक्ष्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले. विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. पी. पुजारी, प्रा. डॉ. पी. के. वाघमारे, प्रा. डॉ. निलोफर शेख, प्रा. डॉ. रेश्मा सनदी, प्रा. सलीम मुल्ला, प्रा. फातिमा मुल्ला आदी उपस्थित होते.



**इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने वन्यजीव सप्ताहनिमित्त अशाप्रकारे पोस्टरप्रदर्शन भरविण्यात आले.**

Scanned with CamScanner

दै. सकाळ

14/10/2019

# डीकेएएससी महाविद्यालयात वाङ्मय मंडळ

**इचलकरंजी, ता. १३ :** येथील डीकेएएससी महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचे उद्घाटन झाले. मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संजय थोरात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी भाषण कला आत्मसात करत असताना वक्त्याचे नियम पाळले पाहिजेत, असे सांगत व्यक्तिमत्त्व विकासावर विनोदी शैलीत मार्गदर्शन प्रा. थोरात यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी इंग्रजी विभाग भित्तीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. विद्यार्थ्यांना विचारलेल्या प्रश्नावर समाधानकारक उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. थोरात यांनी स्वयंलिखीत वक्तृत्व हे पुस्तक दिले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. स्वागत व प्रास्ताविक वाङ्मय मंडळ विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी केले.




**इचलकरंजी : : येथील डीकेएएससी महाविद्यालयात वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. संजय थोरात.**

CS Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

18/10/2019

# इचलकरंजीत वाचन प्रेरणा दिन विविध उपक्रमांनी साजरा

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील आपटे वाचन मंदिरामध्ये माजी राष्ट्रपती भारतरत्न ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनी वाचन प्रेरणा दिन झाला.

दरवर्षीप्रमाणे दिवसभर विविध शाळांमधील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी ग्रंथालयास भेट दिली आणि ग्रंथालयात बसून पुस्तकांचे वाचन केले. समर्थ विद्यामंदिरचे विद्यार्थी व शिक्षक संदीप रजपूत, सौ. सुनिता वस्तरे, रुपाली गवळी आणि सौ. प्रज्ञा डिग्रजकर यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. इचलकरंजीतील काही शाळांमध्ये ग्रंथालयातर्फे वाचनासाठी पुस्तके देण्यात आली.

इंदुमती आवाडे गर्ल्स हायस्कूलमध्ये ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. मुख्य कार्यक्रम सायंकाळी ग्रंथालयात झाला. त्यावेळी मथुरा हायस्कूलचे मुख्याध्यापक आनंद खोंद्रे, सहकारी शिक्षक एस. एम. पाटील, एस. ए. माने, एम. ए. साळुखे, पी. व्ही. पाटील, एस. बी. निर्मळे यांनी विद्यार्थ्यांकडून विविध साहित्य प्रकार प्रकटपणे वाचून घेतले. ग्रंथालयातील पुस्तके विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या हाती दिली. यावेळी अब्दुल कलामाच्या चरित्रातील काही पृष्ठांचे वाचन करुन त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. ग्रंथालयाचे अध्यक्ष ॲड. स्वानंद कुलकर्णी, कार्यवाह संजय देशपांडे व संचालक प्रा. अशोक दास यांनी वाचन प्रेरणा दिनाचे नियोजन केले, ग्रंथालयातील आनंदा काजवे, सुनिता सामंत व कर्मचाऱ्यांनी दिवसभर विद्यार्थ्यांचे स्वागत केले. तसेच ग्रंथालयातील विविध विभागांची माहिती दिली.




**इचलकरंजी : आपटे वाचन मंदिरमध्ये वाचन प्रेरणा दिनानिमित्त माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजनप्रसंगी समर्थ विद्यामंदिरचे शिक्षक व विद्यार्थी.**

### कबनूर हायस्कूल

डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक बी. बी. मगदूम व प्रमुख वक्ते एस्. बी. नोरजे यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत पर्यवेक्षिका सौ. के. यु. पोतदार यांनी केले. डॉ. कलाम यांचे भारतीय विज्ञान, संशोधन, क्षेपणास्त्र निर्मितीतील कार्य व वाचनाची आवड याबद्दल विविध उदाहरणे देवून माहिती दिली. यावेळी एस. बी. कोळेकर, एस. एम. माळी, एम. एम. मुरतले, ग्रंथपाल एस. व्ही. घोरपडे, शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन जिमखाना प्रमुख उमेश बरगाले यांनी केले. आभार सांस्कृतिक विभागप्रमुख संजय चौगुले यांनी मानले.

### डीकेएएससी

दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिन व जागतिक विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटनाने कार्यक्रमाची सुरवात प्रास्ताविक ग्रंथपाल व्ही. बी. यादव यांनी केले. कार्यक्रमास प्रा. डॉ. ई. बी. आळवेकर यांनी वाचन संस्कृतीविषयी मार्गदर्शन केले. सौ. शैलजा चनगुंडी यांनी इंग्रजी भाषेतून डॉ. कलाम यांच्या कविता सादर केल्या. विद्यार्थी प्रथमेश नेजे, रिमा नडाळे व मयुरी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. एम. एम. कांबळे, प्रा. व्ही. बी. पाटील, प्रा. डॉ. एस. आय. नुराणी, प्रा. डॉ. डी. जी. घोडके, आर. एस. चव्हाण, सौ. कदम, सौ. मगदूम, सौ. सूर्यवंशी, विद्यार्थी– विद्यार्थिनी उपस्थित होते. आभार प्रा. अतिश पाटील यांनी मानले.

### श्री बालाजी लायब्ररी

डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. विजय बाबर, मदनराव कारंडे, बालाजी पतसंस्थेचे जनरल मॅनेजर दिनेश रेंदाळकर यांच्या प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे औचित्य साधून ग्रंथपाल विनोद झपाटे व सौ. सुप्रिया पोवार यांनी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करुन मुलांना वाचनासाठी दुर्मीळ ग्रंथ उपलब्ध करुन दिले. अभ्यासासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना लायब्ररीतर्फे मान्यवरांच्या हस्ते पुस्तके भेट देण्यात आली. आभार आर. आर. पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन शितल शहाणे यांनी केले.

### बालाजी माध्यमिक विद्यालय

वाचनाने स्वतःला समृद्ध करुन देशाला समृद्ध बनवा, असे आवाहन मुख्याध्यापिका सौ. एम.एस. रावळ यांनी केले. श्री बालाजी माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेजमध्ये वाचन प्रेरणादिन कार्यक्रमात बोलत होत्या. सुधाकर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सौ. एस. आर. खोत यांनी केले. विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घेतला. यावेळी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. आभार सौ. के. आर. लोहार यांनी मानले. सूत्रसंचालन कोळी यांनी केले.

Scanned with CamScanner

दै. महासत्ता

19/10/2019

# एएससी कॉलेज

**इचलकरंजी,ता.१८–**

दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिन व जागतिक विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल यादव व्ही.पी.यांनी केले. या कार्यक्रमास प्रा.डॉ.ई.बी.आळवेकर,प्रा.सौ.शैलजा चनगुंडे,प्रथमेश नेजे, रिमा नडाळे व मयुरी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी प्रा.एम.एम.कांबळे,प्रा.व्ही.बी.पाटील, प्रा.डॉ.एस.आय.नुराणी, प्रा.डॉ.डी.जी.घोडके,सहाय्यक ग्रंथपाल आर.एस.चव्हाण, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा.अतिश पाटील यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
१८ नोव्हेंबर २०१९

अवतीभवती



इचलकरंजी : विभागीय मैदानी स्पर्धेत उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या स्फूर्ती मानेसह प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. मेजर मोहन वीरकर.

# डीकेएएससी महाविद्यालयाची खेळाडू स्फूर्ती माने उंच उडीत प्रथम

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयाची खेळाडू स्फूर्ती माने हिने जिल्हास्तरीय विभागीय मैदानी स्पर्धेत उल्लेखनीय यश प्राप्त केले. १७ वर्षाखालील उंच उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत १.६५ मीटर उंच उडी मारून विक्रम नोंदवला. तिची सातारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. आकाश बनसोडे, प्रा. सुखदेव सजगणे, पालक सुभाष माने, जयकुमार करके यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

दै. सकाळ.


दि. 19/11/2019

# प्रा. मोहन वीरकर यांना मेजरपदी बढती

सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. १८ : येथील डीकेएएससी महाविद्यालयाचे एनसीसी विभाग प्रमुख प्रा. मोहन वीरकर यांची मेजरपदी बढती मिळाल्याने सत्कार करून खांद्यावर अशोक स्तंभ लावण्यात आला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एनसीसी प्रतिनिधी पंजाबराव पोवार, पै. अमृत भोसले यांच्या उपस्थितीत प्रा. वीरकर यांना मेजर पदवी सुपूर्द करण्यात आली. ५६ महाराष्ट्र बटालियनचे उदय बारावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी ही पदवी संपादन केली.

मनापासून कष्ट केले तर तो आनंद मोठा असतो. मिळालेले काम ही संधी असून आज मिळालेली मेजर पदवी याचेच फळ आहे. असे प्रा. वीरकर यांनी सांगितले. यावेळी एनसीसी कॅडेटनी प्रा. वीरकर यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मान केला. प्राचार्य डॉ. कुंभार, पै. भोसले, गोविंदराव हायस्कूल एनसीसी प्रमुख सी. पी. कोरे यासह एनसीसी कॅडेटनी मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक प्रा. व्ही. बी. पाटील यांनी केले. आभार अनुराधा पाटील यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी केले.



**इचलकरंजी : प्रा. मोहन वीरकर यांची मेजरपदी बढती मिळाल्याने खांद्याला अशोकस्तंभ लावून ही पदवी सुपूर्द केली. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अमृत भोसले, सी. पी. कोरे, पंजाबराव पोवार आदी.**

Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
९ डिसेंबर २०१९



इचलकरंजी : वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या माती परीक्षण प्रकल्पाचे सादरीकरणावेळी प्राध्यापक, विद्यार्थी.

# डीकेएएससीमध्ये मृदा दिन साजरा

**इचलकरंजी** : येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे जागतिक मृदा दिन साजरा करण्यात आला. जमीन हा मर्यादित स्वरूपाचा नैसर्गिक स्त्रोत असल्यामुळे त्याची योग्य जोपासना करून भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी जमिनीचे आरोग्य सुस्थितीत ठेवणे ही आपली जबाबदारी आहे, असे मत डॉ. एस. एस.कांबळे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मांडले. जमिनीच्या प्रकारानुसार पिकांची निवड, माती परीक्षणानुसार खतांचा संतुलित वापर, पिकांची फेरपालट, सेंद्रिय खतांचा नियमित वापर, इत्यादींचा वापर करुन जमिनीची सुपिकता टिकवून ठेवणे, यासाठी वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी प्रा. मधुमती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या माती परीक्षण प्रकल्पाचे सादरीकरण ही करण्यात आले. या वेळी डॉ. व्ही. बी. शिंपले, विभागप्रमुख डॉ. व्ही. ए. पाटील, डॉ. एस. टी. इंगळे, प्रा. दोपारे, प्रा. कट्टी, प्रा. खोत आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दैनिक महासत्ता
शुक्रवार, ता. १३ डिसेंबर २०१९



खिद्रापूर : येथील ऐतिहासिक कोपेश्वर मंदिराची इचलकरंजीतील एनसीसीच्या मुलांनी स्वच्छता केली, त्यानंतर परिसरातील असा मोठ्या प्रमाणात कचरा विद्यार्थ्यांनी एकत्र केला.

# महापुरामुळे दुर्लक्षित कोपेश्वर मंदिराची सफाई

सै.टाकळी, ता. १२–

देशातील प्रसिध्द मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिराची तब्बल दिडशेहून अधिक इचलकरंजीतील एनसीसीच्या मुलांनी साफसफाई करून परिसराला एक झळाळी आणली.

इचलकरंजीतील डीकेएएससी महाविद्यालय, आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, गोविंदराव हायस्कूल आणि डॉ. बापूजी साळुंखे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला होता. ५६ महाराष्ट्रीयन बटालियन, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन कोल्हापूर आणि संवाद सामाजिक मंडळ इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता पकवैडा निमित्त ही मोहिम घेण्यात आली.

एनसीसीच्या दिडशेहून अधिक मुलांनी सकाळी दहा वाजता खिद्रापूर मंदिर परिसराची स्वच्छता सुरू केली आणि दुपारपर्यंत मंदिराचा संपूर्ण परिसर चकचकीत करून परिसराचे रूप आणखीन खुलवून टाकले. महापुरानंतर या मंदिराकडे फारसे लक्ष कोणाचे नव्हते. विद्यार्थ्यांनी चार तासाहून अधिक श्रमदान करीत परिसरातील कचरा, वाढलेली झाडी, झुडपे त्याचबरोबर मंदिराच्या इमारतीवर पडलेला पाळापाचोळा याची स्वच्छता केली. मेजर मोहन वीरकर, लेफ्टनंट प्रमिला सुर्वे, सी. पी. कोरे, किरण कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली ही स्वच्छता मोहिम झाली. यावेळी खिद्रापूरचे सरपंच हैदरखान मोकाशी, माजी सरपंच रावसाहेब रायनाडे, उपसरपंच मियाखान मोकाशी, रघुनाथ जोशी, शहनशाह चिकोडे, सुरेश गुरव, उमेश गुरव यांच्यासह ग्रा.पं. सदस्य व नागरिक उपस्थित होते. यावेळी कन्या महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी स्वच्छता मोहिम या विषयावर पथनाट्य सादर केले. महाराष्ट्रायीन बटालियनचे कर्नल उदय बारावकर, ६ महाराष्ट्रीयन गर्ल्स बटालियनचे कर्नल मोहन तिवारी, प्राचार्य डॉ. कुंभार, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे या मोहिमेसाठी मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

दै. तरुण भारत दि. 14/12/2019



इचलकरंजी : खिद्रापूर येथील ऐतिहासिक कोपेश्वर मंदिराची एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली.

# खिद्रापूरच्या कोपेश्वर मंदिर परिसराची स्वच्छता

प्रतिनिधी
इचलकरंजी

खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिराची सुमारे १५० एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी साफसफाई करून परिसराला झळाळी आणली.

येथील डीकेएएससी महाविद्यालय, आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, गोविंदराव हायस्कूल आणि डॉ. बापूजी साळुंखे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला होता. ५६ महाराष्ट्रीयन बटालियन, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन कोल्हापूर आणि संवाद सामाजिक मंडळ इचलकरंजी यांच्या विद्यमाने स्वच्छता पंधवरड्यानिमित्त मोहिम घेण्यात आली.

महापुरानंतर या मंदिराकडे लक्ष कोणाचे नव्हते. विद्यार्थ्यांनी सुमारे ४ तास श्रमदान करीत परिसरातील कचरा, वाढलेली झाडे झुडपे त्याचबरोबर मंदिराच्या इमारतीवर पडलेला पालापाचोळा याची स्वच्छता केली. मेजर मोहन वीरकर, लेफ्टनंट प्रमिला सुर्वे, सी. पी. कोरे, किरण कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली ही स्वच्छता मोहिम झाली. यावेळी खिद्रापूरचे सरपंच हैदरखान मोकाशी, माजी सरपंच रावसाहेब रायनाडे, उपसरपंच मियाखान मोकाशी, रघुनाथ जोशी, शहनशाह चिकोडे, सुरेश गुरव, उमेश गुरव यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व नागरिक उपस्थित होते. यावेळी कन्या महाविद्यालयाच्या विद्यार्थीनीनी स्वच्छता मोहिम या विषयावर पथनाट्य सादर केले. ५६ महाराष्ट्रायीन बटालियनचे कर्नल उदय बारावकर, ६ महाराष्ट्रीयन गर्ल्स बटालियनचे कर्नल मोहन तिवारी, प्राचार्य डॉ. कुंभार, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे या मोहिमेसाठी मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

14-12-2019

» अवतीभवती 14-12-2019 सकाळ




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात जागर युवतींचे या समुपदेशन कार्यक्रमात बोलताना सौ. ललिता पुजारी.

## ‘डीकेएएससी’मध्ये विद्यार्थिनींना समुपदेशन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात महिला सबलीकरण समितीतर्फे जागर युवतींचे हा विद्यार्थिनींना समुपदेशन कार्यक्रम झाला. प्रमुख वक्त्या सौ. ललिता पुजारी यांनी मुलींनी मोबाईलचा वापर चांगल्या गोष्टीसाठी करावा असा सल्ला देत आत्मविश्वासाची जाणीव करून दिली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. या वेळी डॉ. पी. पी. पुजारी, डॉ. ए. ए. घारे, डॉ. पी. के. वाघमारे, डॉ. ए. एस. तपासे, डॉ. आर. ए. सनदी, एम. एस. नदाफ, मेजर मोहन वीरकर उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
मंगळवार, २४ डिसेंबर २०१९



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात प्रतिभा संशोधन प्रकल्प प्रदर्शन भरविण्यात आले.

# डीकेएएससीमध्ये संशोधन प्रकल्प प्रदर्शन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात प्रतिभा संशोधन प्रकल्प प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक दृष्टिकोनाला बळ देण्यासाठी आयोजित केलेल्या या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी वास्तव विषयांची अभ्यासपूर्ण मांडणी केली. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. प्रतिभा संशोधन प्रकल्प प्रदर्शनात मानसशास्त्र, भाषा, साहित्य, शिक्षणशास्त्र, व्यापार नियोजन, शुद्ध विज्ञान, शेती आणि प्राणीजीवन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, मेडिसिन आणि फार्मसी या विषयांवर विविध पोस्टर्स, मॉडेल्स तयार करून विद्यार्थ्यांनी सादर केले. या प्रदर्शनात दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पाचे सादरीकरण केले. विज्ञानातील आधुनिक बदलावर नावीन्यपूर्ण उपकरणे तयार केली. जैवविविधतेत विविध प्राण्यांच्या बचावासाठी उत्तम सूचक मॉडेल्स सादर केली आहेत. सेंद्रिय शेती काळाची गरज सांगणारे व व्यापारातील सुसूत्रीकरण अशी वैविध्यपूर्ण मांडणी पोस्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केली. डॉ. ए. एस. तपासे यांनी प्रदर्शनाचे आयोजन केले. डॉ. व्ही. डी. देशमुख, डॉ. एस. एस. साठे, डॉ. एस. बी. जाधव यांनी परीक्षण केले.

CS Scanned with CamScanner

बुधवार
दै सकाळ दि. 25/09/2019




इचलकरंजी : येथील डीकेएएसी महाविद्यालयाच्या वतीने देशभरातील लैंगिक अत्याचारविरोधी व जनजागृतीपर शहरात रॅली काढण्यात आली.

## डीकेएएसी महाविद्यालयाची रॅली

**इचलकरंजी :** डीकेएएसी महाविद्यालयाच्यावतीने देशभरातील लैंगिक अत्याचारविरोधी व जनजागृतीपर शहरात रॅली काढण्यात आली. स्त्रियांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ व समाजात जनजागृती व्हावी या उद्देशाने रॅलीचे आयोजन केले. महाविद्यालयाचे हजारो विद्यार्थी या रॅलीत हातात फलक घेऊन सहभागी झाले. डीकेएएसी महाविद्यालयापासून शहराच्या मुख्य मार्गावरून ही रॅली काढण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. ए. पी. जाधव, मेजर मोहन वीरकर, प्रा. पी. ए. हराळे, प्रा. आकाश बनसोडे यासह शिक्षक, प्राध्यापक उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

गुरुवार,
२ जानेवारी २०२०

# डीकेएएससीमध्ये १०० दात्यांचे रक्तदान

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयात नववर्षानिमित्त रक्तदान शिबिर झाले. वनस्पती शास्त्र, एनसीसी, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते या शिबिराचे उद्‍घाटन झाले. यावेळी मेजर मोहन वीरकर, डॉ. सुभाष इंगळे, डॉ. विजयकुमार पाटील, प्रा. मधुरा शिंदे, प्रा. आरती खोत, प्रा. ढोबळे यासह विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ दि. 6/1/2020



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात प्रश्नमंजूषा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी.

## डीकेएएससी महाविद्यालयात स्पर्धा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने प्रश्नमंजूषा स्पर्धा झाली. स्पर्धेत दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी गटांसह सहभाग घेतला. स्पर्धेत विशाल पाटील, ओंकार पाटील, अजय पाटील या गटाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध उपक्रम व ट्रेझर हंट आदी स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. डॉ. विजयकुमार पाटील, प्रा. डॉ. एस. टी. इंगळे, प्रा. मधुरा शिंदे, प्रा. आरती खोत, प्रा. कट्टी, प्रा. दोपारे आदी उपस्थित होत्या.

दै. सकाळ दि. 7/1/2020




इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालयांतर्गत एकदिवसीय कार्यशाळेत बोलताना पोलिस उपअधीक्षक जितेंद्र जाधव.

## डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालयांतर्गत एकदिवसीय कार्यशाळा झाली. पोलिस उपअधीक्षक जितेंद्र जाधव यांनी उत्तम नागरिक कसा असावा, याविषयी पहिल्या सत्रात मार्गदर्शन केले. जगण्याचा आलेख शुद्ध, स्वच्छ व यशस्वी असायला हवा. उत्तम नागरिक होण्यासाठी स्वतःला ओळखता आले पाहिजे, असे श्री. जाधव यांनी सांगितले. दुसऱ्या सत्रात ॲड. सुरेश चौगुले यांनी कायद्यानुसार नागरिकांचे अधिकार विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. उद्योजक दत्तात्रय आळवेकर व दीपक गायकवाड उपस्थित होते. या वेळी डॉ. एस. जे. वेल्हाळ, मेजर मोहन वीरकर, डॉ. वैशाली ढोबळे, डॉ. एस. आय. नुराणी, डॉ. ए. एस. तपासे, प्रा. विश्वंभर कुलकर्णी आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, शनिवार,
११ जानेवारी २०२०

## रिफ्लेक्टर्स बसवण्यास आज प्रारंभ

**इचलकरंजी :** संवेदना फाउंडेशन व जिल्हा सुरक्षा समितीतर्फे उद्या (ता. ११) डीकेएएससी महाविद्यालयात रस्ते दुभाजकांवर रिफ्लेक्टर्स लावण्याच्या मोहिमेस सुरवात होत आहे. राष्ट्रीय रस्ते सुरक्षा सप्ताहाचे औचित्य साधून सौ. रिटा रॉड्रीग्यूस यांनी तयार केलेल्या वाहतूक सुरक्षा नियमांच्या डिजिटल फलकांचे प्रदर्शन भरविण्यात येईल. कार्यक्रमास अप्पर पोलिस अधीक्षक श्रीनिवास घाडगे, नगराध्यक्षा अलका स्वामी, उपनगराध्यक्ष तानाजी पोवार, प्रशांत साळी, वाहतूक पोलिस निरीक्षक नंदकुमार मोरे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या उपक्रमास उपस्थित राहून या जनजागृती मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

CS Scanned with CamScanner

सकाळ

शनिवार,
११ जानेवारी २०२०




**इचलकरंजी :** डीकेटीईच्या इंग्लिश मेडियम हायस्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजचा वार्षिक क्रीडा महोत्सवात बोलताना मेजर मोहन वीरकर.

# 'डीकेटीई'मध्ये क्रीडा महोत्सव

**इचलकरंजी :** डीकेटीईच्या इंग्लिश मेडियम हायस्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सवास प्रारंभ झाला. मेजर मोहन वीरकर यांच्याहस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित व ध्वजवंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ देण्यात आली. प्राचार्या सौ. माला सूद, अशोक सावंत, व्ही. बी. चौगुले, विश्वास माने, सुहास पवळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सोमवार,
१३ जानेवारी २०२०

सकाळ




इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात भूगोल शास्त्र विभागातर्फे एकदिवसीय कार्यशाळेत बोलताना डॉ. एस. एस. पन्हाळकर आदी.

## डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयात भूगोल शास्त्र विभागातर्फे अग्रणी महाविद्यालयांतर्गत 'जीएसआय, जीपीएस व सुदूर संवेदन तंत्रज्ञानासाठी भूगोल शास्त्राचा वापर' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. प्रा. सुभाष चवरे यांनी भूगोल शास्त्रातील संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध पद्धती व सॉफ्टवेअर संबंधीची माहिती देऊन आर्थिक, सामाजिक, आरोग्य व शेतीविषयक समस्या सोडविण्यासाठी या तंत्रज्ञानाचा कसा वापर होईल, या संबंधी माहिती दिली. जेएसआय, जीपीएस व सुदूर संवेदनाचा वापर सामाजिक शास्त्रांमध्ये विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रकर्षाने वापर केला जात असून यामध्ये करिअर करण्यासाठी कोणतेच बंधन नसून कोणत्याही शाखेतील विद्यार्थ्याला यामध्ये करिअर करता येते, असे डॉ. एस. एस. पन्हाळकर यांनी सांगितले. या कार्यशाळेत शहर व परिसरातील ९ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. सुनिता वेल्हाळ, डॉ. आतीश पाटील आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
गुरुवार, १६ जानेवारी २०२०




इचलकरंजी : १) ढोल-ताशाच्या तालावर ठेका धरत युवतींनी आनंद घेतला. २) युवकांनी हौशी कलागुण सादर करत मनमुरादपणे मनोरंजन केले. (पद्माकर खुरपे : सकाळ छायाचित्रसेवा)

# महाविद्यालयांत 'ट्रॅडिशनल डे' ची धूम

## वैविध्यपूर्ण वेशभूषेमध्ये विद्यार्थी ; इचलकरंजीत व्यंकटेश महाविद्यालयाच्यावतीने रॅली

सकाळ वृत्तसेवा

**इचलकरंजी, ता. १५ : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ट्रॅडिशनल डे उत्साहात साजरा केला. विविधरंगी पोषाखांमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांमुळे वस्त्रनगरीचे वातावरण सांस्कृतिक झाले होते. पारंपरिक व्यक्तिरेखांसह धोती-कुर्ता, नऊवारी साडी, फेटा अशा विविध पोषाखांमध्ये युवक, युवतींनी कॉलेजला हजेरी लावली. विविध महाविद्यालयांत विद्यार्थी, प्राध्यापकांच्या प्रतिसादामुळे ट्रॅडिशनल डे दणक्यात साजरा झाला.**

मकर संक्रांतीदिवशी पारंपरिकपणा जपावा आणि विद्यार्थ्यांच्या हौशी कलागुणांना वाव मिळावा यासाठी दरवर्षी शहरातील सर्व महाविद्यालयांत ट्रॅडिशनल डे साजरा केला जातो. विद्यार्थी आपले कलागुण जपत स्वतंत्र अथवा समूहाने वेशभूषा करून कॉलेजला हजेरी लावतात. कन्या महाविद्यालय, डीकेएएससी महाविद्यालय, व्यंकटेश महाविद्यालय ही महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या वैविध्यपूर्ण वेशभूषेने सजून गेली. व्यंकटेश महाविद्यालयाच्यावतीने शहराच्या प्रमुख मार्गांवरून रॅली काढण्यात आली. अन्य महाविद्यालयांत पारंपरिकपणा जपत ट्रॅडिशनल डे साजरा करण्यात आला.

यंदाही विद्यार्थी पारंपरिक धोती- कुर्ता, नऊवारी साडी, फेटा या पोषाखांत दिसून आले. बदलत्या जगात विद्यार्थ्यांनी बाह्य प्रदेशातील लोकसंस्कृतीचे दर्शन ट्रॅडिशनल डेच्या माध्यमातून घडविले. अनेकजण काळा सदरा आणि पांढरी लुंगी, तर फॅशनेबल ड्रेस अशा पोषाखांत दिसत होते. पारंपरिक ढोलपथक हलगीच्या आवाजाने ट्रॅडिशनल डेमध्ये धमाल आणली. युवक-युवतींनी ढोलपथक हलगीच्या आवाजावर ताल धरत मनमुरादपणे आनंद घेतला. टीव्ही, चित्रपट, सिरिअलचा प्रभावही दिसून आला. बाळूमामा, देव देवता, विविध अभिनेते यांच्या वेषभूषेचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. यावेळी तरुणाईने मराठीसह गुजराथी, बंगाली, दाक्षिणात्य व राजस्थानी अशा संस्कृतीचे दर्शन पारंपरिक पोषाखांतून घडवले. ट्रॅडिशनल डे मध्ये एकूणच तरुणाई विविध रंगांच्या वेशभूषा, रंगभूषेने सजली होती.

### हुल्लडबाजीला हवा लगाम

परंपरा टिकावी या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना ट्रॅडिशनल डेच्या निमित्ताने वाव दिला जातो. तरुणाईतून जल्लोष करण्याच्या नादात शिस्त मोडली जाते. ट्रॅडिशनल डे महाविद्यालयात साजरा करून इतर परिसरात रस्त्यावर दंगा मस्ती करताना अनेक विद्यार्थी दिसून आले. मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी, येणाऱ्या, जाणाऱ्यास त्रास असे अनेक प्रकार झाले. त्यामुळे हुल्लडबाजांवर लगाम घालणे गरजेचे आहे.

Scanned with CamScanner

सकाळ
गुरुवार, १६ जानेवारी २०२०

# डीकेएएससी कॉलेज पथनाट्यात प्रथम

## राज्यस्तरीय युवास्पंदन स्पर्धेचा दुसरा दिवस; लघुनाटिकेमध्ये विवेकानंद कॉलेज विजेते

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. १५ : येथील मनोरंजन मंडळ आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल व श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन यांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय युवास्पंदन स्पर्धा उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी आविष्कार - पथनाट्य स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी यांनी मिळवले. लघुनाटिका स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर या संघाने मिळविले.

पथनाट्य स्पर्धेत सहभाग घेतलेल्या संघांनी स्त्री भ्रूण हत्या, राजकीय गोंधळ, देशभक्ती आणि पुरूषार्थाच्या चुकीच्या कल्पना अशा



**इचलकरंजी : युवा स्पंदन पथनाट्य स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाच्या संघास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देताना प्रकाश रावळ, समीर गोवंडे, प्रा. प्रशांत कांबळे व बाळासाहेब देवनाळ आदी.**

विषयांवर पथनाट्ये सादर केली. या स्पर्धेत देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज, कोल्हापूर यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. शहीद वीर पत्नी लक्ष्मीबाई महाविद्यालय, टिटवे यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

लघुनाटिका स्पर्धेतील संघांनी पर्यावरण वाचवा, तृतीय पंथीयांच्या वेदना, भ्रष्टाचार, सद्यस्थिती, मोबाईलचे दुष्परिणाम व शिक्षण प्रसार इत्यादी विषय मांडले. स्पर्धेतील द्वितीय क्रमांक रंगानुभव, कोल्हापूर या संघाने तर तृतीय क्रमांक डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी यांनी मिळविला. उत्तेजनार्थ क्रमांक देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज, कोल्हापूर या संघाने प्राप्त केला.

दोन्ही स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून प्रा. डॉ. आनंद बल्लाळ (आजरा), रंगकर्मी यशोधन गडकरी (सांगली) आणि रंगकर्मी राज पाटील (कोल्हापूर) यांनी जबाबदारी पार पाडली. सुरूवातीला आविष्कार स्पर्धा उद्घाटनप्रसंगी नागेंद्र रंगरेज यांच्या व परीक्षकांच्याहस्ते नटराज प्रतिमा पूजन करण्यात आले. स्पर्धा समारोप प्रसंगी प्रकाश रावळ आणि समीर गोवंडे, प्रा. प्रशांत कांबळे व बाळासाहेब देवनाळ तसेच सर्व परीक्षक यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. संतोष आबाळे यांनी स्वागत केले तर प्रतीक जाधव यांनी परीक्षकांचा परिचय करून दिला. पथनाट्य स्पर्धेचे सुत्रसंचालन रोहित कुरणे व त्रिंबक दातार यांनी केले तर लघुनाटिका स्पर्धेचे सुत्रसंचालन अक्षय कांबळे व निखील शिंदे यांनी केले.

Scanned with CamScanner

लोकमत
गुरुवार, दि. १६ जानेवारी २०२०

# डीकेएएससी कॉलेज पथनाट्य स्पर्धेत प्रथम

## लघुनाटिकामध्ये विवेकानंद कॉलेज प्रथम; रंगानुभवने मिळविला द्वितीय क्रमांक

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** राज्यस्तरीय युवास्पंदन स्पर्धा उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी पथनाट्य स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक डीकेएएससी कॉलेज (इचलकरंजी)ने मिळविले. लघुनाटिका स्पर्धेत विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर) संघाने प्रथम क्रमांक पटकाविला.

पथनाट्य स्पर्धेत सहभागी संघांनी स्त्रीभ्रूणहत्या, राजकीय गोंधळ, देशभक्ती आणि पुरुषार्थाच्या चुकीच्या कल्पना अशा विषयांवर पथनाट्ये सादर केली. स्पर्धेमध्ये देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज (कोल्हापूर)ने द्वितीय, तर शहीद वीर पत्नी लक्ष्मीबाई महाविद्यालय (टिटवे)ने तृतीय क्रमांक पटकाविला.

लघुनाटिका स्पर्धेतील संघांनी पर्यावरण वाचवा, तृतीयपंथीयांच्या वेदना, भ्रष्टाचार, सद्य:स्थिती, मोबाईलचे दुष्परिणाम व शिक्षण प्रसार, आदी विषय मांडले. स्पर्धेत रंगानुभव (कोल्हापूर)ने द्वितीय, तर




इचलकरंजीत पथनाट्य स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक डीकेएएससी कॉलेजने पटकावले. संघाला मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

डीकेएएससी कॉलेज (ईचलकरंजी)ने तृतीय क्रमांक मिळविला. उत्तेजनार्थ क्रमांक देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज (कोल्हापूर) या संघाने प्राप्त केला. विजयी संघांना प्रकाश रावळ, समीर गोवंडे, प्रा. प्रशांत कांबळे व बाळासाहेब देवनाळ यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

दोन्ही स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून प्रा. आनंद बल्लाळ (आजरा), रंगकर्मी यशोधन गडकरी (सांगली) आणि रंगकर्मी राज पाटील (कोल्हापूर) यांनी जबाबदारी पार पाडली. घोरपडे नाट्यगृहात झालेल्या या स्पर्धेत इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली व राधानगरी भागातील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

CS Scanned with CamScanner

लोकमत
शनिवार, दि. १८ जानेवारी २०२०

## डीकेएएससी कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शन

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह निमित्त ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ परीक्षण सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य एम. बी. हिरुगडे होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रा. डॉ. ई. बी. आळवेकर यांनी ग्रंथ परीक्षण कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले.व्ही. पी. यादव यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. कार्यक्रमास एस. आय. नुराणी, विशाल कांबळे, डी. ए. यादव यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शनिवार, १८ जानेवारी २०२०

# बापूजींचे कार्य अभयकुमार यांनी अखंड ठेवले

**हभप महंत प्रमोद महाराज जगताप : प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस उत्साहात**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या ज्ञान प्रसारातून समाजाला ज्ञानामृत पाजण्याचे काम केले. तेच कार्य प्राचार्य अभयकुमार साळुंखे करत आहेत. डॉ. बापूजी साळुंखे हे चंदनासारखे झिजले आणि इतरांना चंदनासारखे बनविले. बापूजींचे हेच कार्य अभयकुमार अविरतपणे चालवित आहेत, असे विचार ज्येष्ठ प्रवचनकार हभप महंत प्रमोद महाराज जगताप यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांचा सपत्निक मानपत्र देऊन सत्कार करताना खासदार श्रीनिवास पाटील, प्रमोद महाराज जगताप, महापौर ॲड. सूरमंजिरी लाटकर, प्राचार्य शुभांगी गावडे आदी.**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्यावतीने प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवस सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खासदार श्रीनिवास पाटील होते. याप्रसंगी महापौर ॲड. सूरमंजिरी लाटकर, अभयकुमार यांच्या पत्नी प्राचार्या डॉ. शैलजा साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, शाहीर कुंतीनाथ करके यांनी आपले विचार व्यक्त केले.

खासदार श्रीनिवास पाटील म्हणाले, बापूजींच्या कार्याचा वारसा पुढे सुरू ठेवण्याचे काम अभयकुमार यांनी अखंडपणे केले आहे. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा गौरव होतो आहे.

अभयकुमार साळुंखे यांना मानपत्र प्रदान केले. महाराष्ट्र राज्य वारकरी संप्रदायाच्यावतीने तुळशीहार, कोल्हापूर विभागाच्या वतीने चांदीची महालक्ष्मीची मूर्ती आणि मराठवाडा विभागाच्यावतीने चांदीची तलवार देऊन त्यांचा सत्कार केला. डॉ. बापूजी साळुंखे 'विवेकदीप' द्विखंड गौरव ग्रंथाचे प्रकाशन केले प्रास्ताविक सहसचिव प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी, आभार सहसचिव प्राचार्य डॉ. युवराज भोसले यांनी केले.

**विविध उपक्रम**

विवेकानंद कॉलेजच्या एनसीसी, सीपीआर, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक यांच्यावतीने रक्तदान शिबिराच आयोजन केले होते. ज्ञानशिदोरी उपक्रमाअंतर्गत विवेकानंद महाविद्यालयाच्यावतीने ५०० पुस्तके जमा झाली.

**नवऊर्जा, नवउमेद मिळाली...**

बापूजींनी लावलेल्या ज्ञानज्योतीचा प्रकाश शिक्षणाच्या माध्यमातून घराघरांत पोहोचला आहे. संस्थेचा शैक्षणिक विकास करण्याचा आटोकाट प्रयत्न करेन. आपण माझ्याप्रती कृतज्ञता व्यक्त करत सत्कार केला त्याबद्दल मला नवीन ऊर्जा, नवी उमेद मिळाली आहे.

**प्राचार्य अभयकुमार साळुंखे**

Scanned with CamScanner

पुढारी

कोल्हापूर, शनिवार, १८ जानेवारी २०२०



कोल्हापूर : अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा सत्कार करताना खा. श्रीनिवास पाटील. सोबत महापौर ॲड. सूरमंजिरी लाटकर, प्रमोद महाराज जगताप, प्राचार्या डॉ. शैलजा साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या ज्ञान प्रसारातून समाजाला ज्ञानामृत दिले. तेच कार्य प्राचार्य अभयकुमार साळुंखे करत आहेत, असे मत ज्येष्ठ प्रवचनकार व संत साहित्याचे अभ्यासक प्रमोद महाराज जगताप यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

स्वामीविवेकानंदशिक्षणसंस्थेतर्फे आयोजित प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवस सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी प्रा. अभयकुमार साळुंखे आणि त्यांच्या पत्नी प्राचार्या डॉ. शैलजा साळुंखे यांचा न्यू मॉडेलच्या महिला स्टाफने ७५ पणत्या प्रज्वलित करून औक्षण केले. महाराष्ट्र राज्य वारकरी संप्रदायातर्फे तुळशीहार घालून, कोल्हापूर विभागातर्फे चांदीची महालक्ष्मीची मूर्ती आणि मराठवाडा विभागाने चांदीची तलवार देऊन त्यांचा सत्कार केला. अध्यक्षस्थानी खा. श्रीनिवास पाटील होते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे 'विवेकदीप' द्विखंड गौरव ग्रंथाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

खा. श्रीनिवास पाटील म्हणाले, बापूजींच्या कार्याचा वसा आणि वारसा पुढे सुरू ठेवण्याचे काम अभयकुमार यांनी अखंडपणे केले आहे. त्यांनी आयुष्यात अनेक संकटे झेलून नदीप्रमाणे सर्वांना सामावून घेत बापूजींच्या ज्ञानाची शिदोरी जतन करण्याचे कार्य केले.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य साळुंखे म्हणाले, बापूजींनी लावलेल्या ज्ञानज्योतीचा प्रकाश शिक्षणाच्या माध्यमातून घराघरात पोहोचला. आपण माझ्याप्रती कृतज्ञता व्यक्त करत सत्कार केला त्यामुळे मला नवीन ऊर्जा व काम करण्याची उमेद मिळाली.

महापौर ॲड. सूरमंजिरी लाटकर, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, शाहीर कुंतिनाथ करके यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी केले. संस्थेचे प्राचार्य डॉ. युवराज भोसले यांनी आभार मानले. उपाध्यक्ष नामदेव कांबळे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, मुरलीधर गावडे, संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, शाखाप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विविध उपक्रम**

वाढदिवसानिमित्त विवेकानंद कॉलेजच्या ७६ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. विवेकानंद महाविद्यालयाने सुमारे ७५ हजार रुपयांची ५०० पुस्तके जमा केली. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या ४०६ संस्कार केंद्रांतर्फे सुमारे तीन कोटी रुपयांचे ग्रंथ विद्यार्थ्यांना व वाचकांना देण्यात येणार आहेत.

Scanned with CamScanner

सकाळ

शनिवार,
१८ जानेवारी २०२०

# अभयकुमारांकडून ज्ञानाची शिदोरी संवर्धित

## खासदार श्रीनिवास पाटील; अभयकुमार साळुंखे यांचा अमृतमहोत्सवी सत्कार

**कोल्हापूर, ता. १७ :** शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या कार्याचा वसा आणि वारसा पुढे सुरू ठेवण्याचे काम अभयकुमार साळुंखे यांनी अखंडपणे केले. त्यांनी आयुष्यात अनेक संकटे झेलून नदीप्रमाणे सर्वांना सामावून घेतले. तसेच बापूजींच्या ज्ञानाची शिदोरी संवर्धित करण्याचे कार्य केले, असे गौरवोद्गार खासदार श्रीनिवास पाटील यांनी येथे काढले.

येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त खासदार पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला. या वेळी ते बोलत होते. जेष्ठ प्रवचनकार महंत श्री प्रमोद महाराज जगताप अध्यक्षस्थानी होते.

जगताप महाराज म्हणाले, "शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्ञान प्रसारातून समाजाला ज्ञानामृत दिले. तेच कार्य प्राचार्य अभयकुमार साळुंखे करीत आहेत."

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, "बापूजींनी लावलेल्या ज्ञानज्योतीचा प्रकाश शिक्षणाव्दारे घराघरात पोहोचला आहे. ही संस्था ज्ञानपीठ व्हावे व येथील विद्यार्थी आंतरराष्ट्रीयस्तरावर यशस्वी व्हावेत, असा प्रयत्न सर्वांचा आहे."

महेश हिरेमठ यांनी भावगीते सादर केली. या वेळी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे 'विवेकदीप' द्विखंड गौरव ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.




**कोल्हापूर : स्वामी विवेकानंद महाविद्यालयात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त शुक्रवारी सत्कार करताना खासदार श्रीनिवास पाटील. शेजारी महापौर ॲड. सूरमंजिरी लाटकर, ज्येष्ठ प्रवचनकार प्रमोद महाराज जगताप, प्राचार्या डॉ. शैलजा साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ आदी.**

महापौर ॲड. सूरमंजिरी लाटकर यांनी मनोगत व्यक्त केले. महेश गायकवाड गौरव ग्रंथाची माहिती दिली. प्राचार्या डॉ. शैलजा साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, शाहिर कुंतीनाथ करके, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ व्यासपीठावर उपस्थित होते. शुभदा हिरेमठ यांनी सुत्रसंचलन करून मानपत्राचे वाचन केले. प्राचार्य डॉ. युवराज भोसले यांनी आभार मानले. संस्थेचे उपाध्यक्ष नामदेव कांबळे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, मुरलीधर गावडे, संस्थेचे आजी माजी पदाधिकारी, शाखाप्रमुख, शिक्षक उपस्थित होते.

### ज्ञानशिदोरी गरजू विद्यार्थ्यांसाठी...

वाढदिवसानिमित्त विवेकानंद महाविद्यालयाने ज्ञानशिदोरी उपक्रम राबविला. यात प्राध्यापक, शिक्षक, माजी विद्यार्थ्यांनी प्राचार्य साळुंखे यांना पुष्पगुच्छ व अन्य भेटवस्तू न देता ग्रंथ भेट दिले. हेच ग्रंथ विद्यार्थ्यांना मोफत दिले जाणार आहेत. विवेकानंद महाविद्यालयातर्फे सुमारे ७५ हजार रुपयांची ५०० पुस्तके संकलित झाली; तर संस्थेच्या ४०६ संस्कार केंद्रांतर्फे सुमारे तीन कोटी रुपयांचे ग्रंथ जमा झाले आहेत.

CS Scanned with CamScanner

लोकमत
www.lokmat.com

कोल्हापूर, शनिवार,
दि. १८ जानेवारी २०२०

# अभयकुमार साळुंखेंकडून ज्ञानदानाचा वारसा

## प्रमोद महाराज जगताप; मान्यवरांच्या उपस्थितीत अमृतमहोत्सवी वाढदिवस उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हे चंदनासारखे झिजले आणि इतरांना त्यांनी चंदनासारखे बनविले. बापूजींचे हेच कार्य प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे अविरतपणे करत आहेत. बापूजींनी दिलेला ज्ञानदानाचा वारसा त्यांनी तेजोमय केला आहे. सदैव सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांना अभय देत संस्था नावलौकिकाला आणली, असे प्रतिपादन ज्येष्ठ प्रवचनकार प्रमोद महाराज जगताप यांनी शुक्रवारी केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य साळुंखे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित सत्काराच्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खासदार श्रीनिवास पाटील, तर महापौर सूरमंजिरी लाटकर प्रमुख उपस्थित होत्या. खासदार पाटील म्हणाले, बापूजींच्या कार्याचा वसा आणि वारसा पुढे सुरु ठेवण्याचे काम अभयकुमार यांनी अखंडपणे केले आहे. प्राचार्य साळुंखे म्हणाले, या सत्काराने मला काम करण्याची उमेद मिळाली आहे. महेश हिरेमठ यांनी भावगीतांचे सादरीकरण केले. प्राचार्य साळुंखे यांचे न्यू मॉडेलच्या महिला कर्मचाऱ्यांनी ७५ पणत्या प्रज्वलित करून सपत्नीक औक्षण केले. खासदार पाटील यांच्या हस्ते प्राचार्य साळुंखे यांना मानपत्र प्रदान केले. शुभदा हिरेमठ यांनी मानपत्राचे वाचन केले. महाराष्ट्र राज्य वारकरी संप्रदायाच्या वतीने तुळशीहार घालून, कोल्हापूर विभागाच्यावतीने चांदीची महालक्ष्मीची मूर्ती आणि मराठवाडा विभागातर्फे चांदीची तलवार देऊन त्यांचा सत्कार केला. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे 'विवेकदीप' द्विखंड गौरव ग्रंथाचे प्रकाशन केले. डॉ. शैलजा साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, यशवंत पाटणे, शाहीर कुंतीनाथ करके, महेश गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. सारंग पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष नामदेव कांबळे, एस. वाय. होनगेकर, मुरलीधर गावडे, आदी उपस्थित होते. आर. व्ही. शेजवळ यांनी प्रास्ताविक केले. युवराज भोसले यांनी आभार मानले.



नसीर अत्तार

कोल्हापुरात शुक्रवारी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते मानपत्र प्रदान केले. यावेळी डावीकडून सूरमंजिरी लाटकर, प्रमोद महाराज जगताप, सारंग पाटील, शैलेजा साळुंखे, शुभांगी गावडे, आदी उपस्थित होते.

### ७५ हजारांची 'ज्ञानशिदोरी' जमा

या वाढदिवसानिमित्त विवेकानंद महाविद्यालयाने 'ज्ञानशिदोरी' उपक्रम राबविला. याअंतर्गत शिक्षक, कर्मचाऱ्यांनी सुमारे ७५ हजार रुपयांची ५०० पुस्तके जमा केली. या पुस्तकांचे सर्व विद्यार्थ्यांना मोफत वितरण होणार आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी
शनिवार, १८ जानेवारी २०२०

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयात स्पर्धा उत्साहात

**इचलकरंजी / प्रतिनिधी :**

येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहानिमित्त ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ परीक्षण, सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य एम. बी.हिरुगडे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविक ग्रंथपाल व्ही. पी. यादव यांनी केले. डॉ. ई. बी.आळवेकर यांनी ग्रंथ परीक्षण कसे करावे, तर प्रा.डॉ. डी. सी. कांबळे यांनी मराठी भाषा, संस्कृतीचे जतन व संवर्धन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले.

या स्पर्धेत अनुराधा पाटील प्रथम, तेजस्वी यमगर्णी द्वितीय, तर स्वाती मानेने तृतीय क्रमांक पटकावला. श्वेता सुतार हिला उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आला. यावेळी एस. आय. नुराणी, प्रा. तपासे, विशाल कांबळे, प्रा. गवळी; प्रा. डी. ए. यादव, ग्रंथपाल आर. एस. चव्हाण आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन पी. बी. शिलेदार यांनी केले. आभार डॉ. एस. पी. जाधव यांनी मानले.

दैनिक महासत्ता

१९ जानेवारी २०२०

# डीकेएएससी कॉलेजमध्ये ग्रंथ परीक्षण सादरीकरण स्पर्धा संपन्न

इचलकरंजी,ता.१८–

दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह निमित्त ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ परिक्षण सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र.प्राचार्य एम.बी.हिरूगडे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

प्रास्ताविक ग्रंथपाल यादव व्ही.पी.यांनी केले. या कार्यक्रमास प्रा.डॉ.ई.बी.आळवेकर यांनी ग्रंथ परिक्षण कसे करावे या विषयी तर डॉ.डी.सी.कांबळे यांनी मराठी भाषा व संस्कृतीचे जतन व संवर्धन कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले.

सदर स्पर्धेत तेजस्विनी यमगर्णे व स्वाती माने या विद्यार्थीनींचा अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक आला. यावेळी प्रा. डॉ. एस.आय. नुराणी,प्रा.डॉ.तपासे,विशाल कांबळे,प्रा.गवळी व प्रा.डी.ए.यादव, आर.एस.चव्हाण विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.सूत्रसंचालन प्रा.पी.बी. शिलेदार व आभार डॉ.ए.पी.जाधव यांनी मानले.

Scanned with CamScanner

दै. सकाळ - 21/1/2020.



इचलकरंजी : डिकेएएससी महाविद्यालयात भूगोल दिनानिमित्त डॉ. डी. एच. पवार यांचा सत्कार करताना प्रा. हिरुगडे, डॉ. डी. सी. कांबळे आदी.

21 JAN 2020 सकाळ

## डीकेएएससी महाविद्यालयात स्पर्धा

इचलकरंजी : भूगोल दिनानिमित्त डीकेएएससी महाविद्यालयात भूगोलशास्त्र विभाग व निसर्गमित्र जीवाचे, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भित्तीपत्रिका मॉडेलचे प्रकाशन व विविध स्पर्धांचे आयोजन केले. प्रमुख पाहुणे डॉ. डी. एच. पवार यांनी विविध उदाहरणे देऊन प्लास्टीकचा वापर, टाकाऊपासून टिकाऊ, जुन्या वस्तुपासुन पुन्हा वापरण्यायोग्य वस्तू बनवणे, तसेच वस्तूचा पुनर्वापर याविषयी मार्गदर्शन केले. शंभरहून विद्यार्थ्यांनी भितीपत्रिका स्पर्धामध्ये सहभाग घेतला. डॉ. डी. सी. कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अध्यक्षस्थानी प्रा. हिरगुडे होते. प्रा. सचिन जाधव, प्रा. शिरढोणे, डॉ. अतिश पाटील आदी उपस्थित होते.

21/1/2020.

## डिकेएएससी महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

इचलकरंजी : डिकेएएससी महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहानिमित्त ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ परीक्षण सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ग्रंथालयातील वाचन साहित्याचा विद्यार्थ्यांनी भरपूर लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख पाहुणे प्राचार्य एम. बी. हिरुगडे यांनी केले. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. डी. सी. कांबळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
शनिवार, २५ जानेवारी २०२०

# 'डीकेएएसी'मध्ये व्याख्यानमाला

**इचलकरंजी :** डीकेएएसी महाविद्यालयात आण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विविध उपक्रम झाले. आण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरी, कथा, वगनाट्य, प्रवास वर्णन अशा स्वरूपाच्या लेखनाचे वर्णन करत त्यांचे संघर्षमय जीवन जगण्याची प्रेरणा देते, असे मत डॉ. बाबुराव गुरव यांनी व्यक्त केले. ते जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत बोलत होते. शाहीर प्रा. संजय जाधव यांनी शाहिरी गायनामध्ये आण्णाभाऊ साठे, अमर शेख, कुंतीनाथ करके यांची कवणे सादर केली. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. ए. पी. जाधव, प्रा. पी. बी. शिलेदार, प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार, २८ जानेवारी २०२०

# प्रजासत्ताक दिन उत्साहात

**डिकेएएससी महाविद्यालय**

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी ध्वजवंदन केले. एनसीसी विद्यार्थी-विद्यार्थिनी संचलन करून ध्वजाला मानवंदना दिली.

CS Scanned with CamScanner

सकाळ | गुरुवार, ३० जानेवारी २०२०

## दिल्ली संचलनात अंकिता खाडेची परेड



खाडे

**इचलकरंजी** : डीकेएएससी महाविद्यालयाची एनसीसी कॅडेट अंकिता खाडे हिने २६ जानेवारीला दिल्लीत झालेल्या संचलनात परेड केली. राजपथ येथे झालेल्या संचलनाच्या निवडीने महाविद्यालयाची परंपरा तिने कायम राखली. आतापर्यंत १० विद्यार्थ्यांची दिल्ली येथील संचलनात निवड झाली होती. १ फेब्रुवारीला मुंबई येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते तिचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. तिच्या या निवडीबद्दल ८ फेब्रुवारीला महाविद्यालयाच्यावतीने शहरातून तिची मिरवणूक काढण्यात येणार आहे. तिला प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, मेजर मोहन वीरकर, ५६ महाराष्ट्र बटालियनचे उदय बारावरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

लोकमत 01/02/2020

# डीकेएएससी कॉलेजमध्ये पुस्तक प्रदर्शन

इचलकरंजी : येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये पुस्तक प्रदर्शन व पुस्तक परीक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. शैलजा चनगुंडी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. विशाल कांबळे यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. डी. जी. घोडे यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ TODAY

शनिवार,
१ फेब्रुवारी २०२०

## 'डीकेएएसी'मध्ये पुस्तक प्रदर्शन

**इचलकरंजी :** डीकेएएसी महाविद्यालयात इंग्रजी विभाग व ग्रंथालयाच्यावतीने पुस्तक प्रदर्शन व पुस्तक परीक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले. स्पर्धेत निरंजन पाटील प्रथम, रिमा नडाळे द्वितीय, ओंकार कांबळे तृतीय तर अस्मिता निपाणीकर हिने उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. यावेळी शैलजा चनगुंडी, डॉ. एस. आय. नुराणी, व्ही. पी. यादव, डॉ. एकनाथ आळवेकर आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत
मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२०

## डीकेएएससी महाविद्यालयात स्पर्धा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाच्यावतीने वादविवाद स्पर्धा घेण्यात आल्या. जंगल जळणे, वृक्षतोड असे विनाशकारी प्रकार घडत असल्यामुळे आद्रभूमी व जैवविविधता या विषयावर ही स्पर्धा घेण्यात आली. यावेळी प्रा. डॉ. विजयकुमार पाटील, प्रा. आरती खोत, प्रा. मधुमती शिंदे, आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
१० फेब्रुवारी २०२०

# विद्यार्थ्यांनी माणसे वाचायला शिकले पाहिजे

## उपकुलसचिव डॉ. शिंदे; एएससी महाविद्यालयाचे पारितोषिक वितरण

इचलकरंजी, ता. ९ : 'वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा क्षण असतो. विद्यार्थ्यांनी पुस्तकांबरोबर माणसंही वाचायला शिकली पाहिजेत. निरीक्षण, आकलन आणि उपयोजितता या त्रिसूत्रीचा जीवनात उपयोग करा,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



इचलकरंजी : पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांचा गौरव करताना सौ. अलका स्वामी. शेजारी अभयकुमार साळुंखे, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. नगराध्यक्षा सौ. अलका स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांनी पंचशील विचाराचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले आहे. बापूजींनी स्वतःची विचारसरणी तयार करून शिक्षकांना गुरुदेव कार्यकर्ते असे संबोधले. त्यामुळे चांगल्या गुणांचा परिपोष शिक्षकांमध्ये यायला हवा, असे मत प्राचार्य साळुंखे यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाच्या कामकाजाच्या अहवालाचे वाचन प्रा. एम. बी. हिरुगडे यांनी केले. वरिष्ठ जिमखाना विभागाचे अहवाल वाचन प्रा. आकाश बनसोडे यांनी केले. कनिष्ठ विभागाचे अहवाल वाचन प्रा.मेजर मोहन वीरकर यांनी केले.

शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त प्राध्यापक व विद्यार्थी तसेच क्रीडा विभाग, सांस्कृतिक विभाग, एनसीसी, एनएनएस विभागातील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. विश्वंभर कुलकर्णी, डॉ. आशिष पाटील यांनी केले. डॉ. डी. सी. कांबळे यांनी आभार मानले. मुख्याध्यापक एस. एस. कांबळे, प्रा. सुखदेव सजगणे, प्रा. व्ही. बी. पाटील, प्रा. शैलजा चनगुंडी, डॉ. पी. पी. पुजारी आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार,
१४ फेब्रुवारी २०२०



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात 'आपत्ती व्यवस्थापन' या कार्यशाळेत बोलताना डॉ. पी. डी. राऊत.

# एएससी महाविद्यालयात कार्यशाळा

इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर कॉमर्स विभागाच्यावतीने अग्रणी महाविद्यालय अंतर्गत कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठातील डॉ. पी. डी. राऊत यांच्या हस्ते झाले. आपत्ती व्यवस्थापनाची ओळख करून देत त्याची कारणे, उपाययोजना, व्यवस्थापनाचे प्रशिक्षण याविषयी मार्गदर्शन केले. दिनकर कांबळे यांनी रेस्क्यूसंबंधी माहिती दिली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. डॉ. एस. जे. वेल्हाळ, डॉ. एस. टी. इंगळे, प्रा. एम. एम. महाजन, प्रा. वांद्रे, प्रा. रॉड्रीक्स, प्रा. जमादार, डॉ. तिरूके आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
शनिवार,
७ मार्च २०२०

# पदवीनंतर समाजाच्या अपेक्षा वाढतात

## डॉ. गुरव; डीकेएएससी महाविद्यालयात पदवीदान समारंभ

सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. ६ : मौल्यवान जीवन जगण्यासाठी दिले जाणारे प्रमाणपत्र म्हणजे पदवी आहे. पदवी नंतर करिअरच्या संधी शोधणे आवश्यक आहे. व्यवसाय, सेवा, कौन्सिलिंग, समाजकार्य या क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. पदवीनंतर पालक आणि समाजाच्या अपेक्षा आपल्याकडून वाढतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एन. एम. गुरव यांनी केले.

डीकेएएससी महाविद्यालय व कन्या महाविद्यालयाच्या संयुक्तपणे दुसऱ्या पदवीदान प्रमाणपत्र वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



इचलकरंजी : डीकेएएससी व कन्या महाविद्यालयाच्या संयुक्तपणे पदवीदान समारंभात पदवीप्राप्त विद्यार्थ्यांसमवेत डॉ. ए. एम. गुरव, प्राचार्य डॉ. युवराज भोसले, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य डॉ. अनिल पाटील.

अध्यक्षस्थानावरून बोलताना विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. युवराज भोसले म्हणाले,'पदवी घेणे म्हणजे पाया निर्माण करणे आहे. स्पर्धेच्या युगात कष्टपूर्वक कौशल्य निर्माण करणे आवश्यक आहे. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना संस्काराची मूल्ये मिळतात.' स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर कुंभार यांनी केले.

अधिसभा सदस्य पंकज मेहता, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, परीक्षा विभागप्रमुख प्रा. डी. ए. यादव, प्रा. संतोष बोराटे, डी. एम. लोकरे, अशोक पाटील आदी उपस्थित होते. तत्पूर्वी कन्या महाविद्यालय ते एएससी महाविद्यालय या प्रमुख मार्गावरून पदवीप्राप्त विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. विविध विद्याशाखेतील एकूण ८४६ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. प्रा. डी. ए. यादव यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. संगीता पाटील यांनी केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
बुधवार,
१८ मार्च २०२०



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने प्रकल्प अनावरण करताना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, विक्रांत ढवळे आदी.

## 'डीकेएएससी'मध्ये प्रकल्प अनावरण

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने प्रकल्प अनावरण, कोरोनाबाबत जागृती, विविध कोर्सचे प्रमाणपत्र वितरण, मास्क वाटप असे विविध कार्यक्रम झाले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रकल्पाचे अनावरण प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्याहस्ते झाले. सीओसी कोर्सचे प्रमाणपत्र वितरण विक्रांत ढवळे यांनी केले. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. व्ही. बी. पाटील, प्रा. हिरीगुडे, प्रा. एम. एम. कांबळे, प्रा. चनगुंडी, प्रा. वर्षा पाटील आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner